ISSN 2394- 5303

# printing® Area

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

Revised Edition

27) आत्मशोधाचा निरंतर प्रवास : अनिकेत
**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे, जि. बुलडाणा** ||110

28) "समकालीन कहानियों में चित्रित विविध सामाजिक समस्याएँ "
**डॉ. विनय सु. चौधरी & विजय वडवराव, औरंगाबाद** ||113

29) "महिला सुरक्षा में सोशल मीडिया की भूमिका"
**डॉ. विमलेश अग्रवाल, ग्वालियर (म.प्र.)** ||116

30) मध्यकालीन राजस्थान की भक्ति–साहित्य में लोक–विश्वास और मान्यताएं
**राकेश कुमार भाटिया, जयपुर** ||120

31) ग्रामीण प्रजननता एवं आर्थिक तथा व्यवसायिक स्तर
**डा० सुमित सिंह चौहान & डा० आर. सी. टिंगल, मैनपुरी** ||125

32) कबीर का समाज सुधारक रूप
**डॉ० गरिमा डिमरी, श्रीनगर गढवाल, उत्तराखण्ड** ||128

33) डॉ जाकिर हुसैन के मानवतावादी शैक्षिक विचार
**पवन सिंह दिनकर & डॉ आराधना पाण्डेय, लखनऊ उ०प्र०** ||133

34) महिला सशक्तिकरण : उभरती चुनौतियाँ
**इति कुमारी, देवघर** ||139

35) अब्राहिम लिंकन का अपने पुत्र के 'शिक्षक' को लिखे पत्र में निहित मूल्यों का...
**डॉ. जयबाला गुप्ता & डॉ. महेन्द्र कुमार तिवारी, जिला बडवानी (म०प्र०)** ||143

36) भारत विभाजन और मेवात प्रदेश
**जाकिर हुसैन, जयपुर** ||147

37) ''राष्ट्रीय चेतना और प्रेस का योगदान''
**अतुल कुमार मिश्र, बिलासपुर (छ.ग.)** ||151

38) गरीब और कमजोर वर्गो का शैक्षणिक स्तर और शिक्षा में निजीकरण का प्रभाव
**डॉ. अनीता देशपांडे & चन्द्रप्रभा जाटव, भोपाल** ||155

39) राजस्थान में नाथ सम्प्रदाय व उनका वेश – एक परिचय
**फूलसिंह योगी, जयपुर** ||159

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

27

# आत्मशोधाचा निरंतर प्रवास : अनिकेत

**प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि.मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगाव. जि. बुलडाणा

***********

मराठी कथावाडमयाचा विचार करीत असतांना कथेचा प्रांत हा समृद्ध राहिलेला आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या प्रांताचा नजारा आपणास स्फुटगोष्टींच्या माध्यामातून पाहायला मिळतो. या स्फुटगोष्टींनी जसे समाजाच्या मनोरंजनाचे कार्य केलेले आहे तसेच प्रबोधन हा सुद्धा तिचा स्वभाव राहिलेला आहे. याच स्वभावाने ती हळूहळू बदलत गेलेली आहे. नवा आशय, नवे परिप्रेक्ष्य तिला खुणावत राहिले व त्यातून ती घडत गेली. १९४० पूर्वीची कथा ही मध्यमवर्गीय पांढरपेशी जीवनामध्ये गुंतून पडलेली होती. सर्वसामान्यांच्या जीवनाचे तिला वावडे होते. त्यामुळे ती माणसे त्यांच्या कथेचा विषय झाले नाही. परंतु मध्यमवर्गीय पांढरपेशी जीवन,त्यांच्या समस्या, नायक—नाईका, राहणीमान आणि भाषा. इ. यापुढे ही कथा मजल मारू शकली नव्हती. परंतु नवकथेने कथेचे सर्व ठरीव संकेत पार पुसून टाकले. व ती बदलायला लागली. कारण नवकथेने जीवनाचे हे साचेबंद रूप पूर्णत: नाकारून एकूणच मानवी अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. व मानवी जीवनाचा अर्थ शोधण्यामध्ये ती व्यस्त झाली. साठोत्तरी कालखंडामध्ये तर ती आणखी वास्तवाभिमुख झाली. त्याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार या कथेमागे होता. साहित्यामागे होता. स्वातंत्रोत्तर कालखंडात शिक्षणाचा झालेला प्रसार आणि त्यातून आलेले नवे भान समाजाचा विचार करायला भाग पडणारे होते. यातून दलित कथा आकाराला येत गेली. तिची अभिव्यक्ती पारंपारिक कथेपेक्षा वेगळी होती. तिची भाषा, अनुभव सर्वांगाने निराळे होते त्यांचे कारण ती कथा एकाच वेळेस शहर आणि ग्राम यातून येऊ लागली. केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, वामन होवाळ, योगीराज वाघमारे, अमिताभ, अविनाश डोळस, योगेंद्र मेश्राम, भीमराव शिवराळे, सुखराम हिवराळे, ऊर्मिला पवार इत्यादींनी महत्वपूर्ण विषय हाताळून दलित कथेला सक्षम केले. याच कथालेखकांमध्ये प्रकाश खरात यांचे नाव घ्यावे लागते.

त्यांचा ‘अनिकेत’ हा कथासंग्रह नव्वदोत्तरी कालखंडामध्ये जन्माला आला आहे. नव्वदोत्तरी जीवन ज्या तर्हेने बदलू लागले त्यांची कारणपरंपरा शोधून त्यावर नेमका इलाज करण्याचा त्यांच्या कथेने प्रयत्न केला आहे. ‘अनिकेत’ या कथासंग्रहामध्ये एकूण बारा कथा आहेत. सांप्रत काळामध्ये निर्माण झालेले अनेक प्रश्न जसे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि मानसिक अशा निनिराळ्या प्रश्नांना ही कथा थेट भिडते. वेगवेगळे समाजस्तर हे त्यांच्या कथेचे वेगळेपण आहे. समाज हा इथून तिथून सारखा आहे या अजानतेपनातील कल्पना जेव्हा भेसूर वास्तव अनुभऊ लागतात तेव्हा प्रत्येकाचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू लागतो. हे कथासूत्र घट्ट होत जाऊन कथा वाचकाजवळ उभी राहते.व जीवनाच्या संदर्भात अनेक प्रश्न उभी करते. प्रकाश खरात जिणगानी या कथेमध्ये परस्पर दोन विरोधी वर्गाचा विचार मांडतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार आपापले आयुष्य सुख समाधानाने व्यतीत करण्याचा प्रयत्न करीत असते. एक वर्ग हा पोटापाण्याच्या उद्देशाने पहाटेला जवळ करण्याचा प्रयत्न करतो तर, दुसरा त्याच्या परिश्रमावर जगण्यासाठीचे आडाखे बांधण्यात आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानत असतो. यातून जो रोष समाजात निर्माण होतो त्यातून सामाजिक बांधिलकीला बाधा होऊन समाजाची घडी अस्थिर होण्यास फारसा वेळ लागत नाही. दुसऱ्या अर्थाने आपणास असे म्हणता येईल की, यातून सामाजिक आणि आर्थिक वातावरण इतके तापू लागते की प्रत्येक मणसाला त्याच्या जातीनुसार आणि मिळकतीनुसार ओळखल्या जाऊ लागते. परिणामी सामाजिक आणि आर्थिक विषमता निर्माण होते. हे चित्र समाजात दिसत असले तरी, कौटुंबिक वातावरण

त्यापासून सुटू शकत नाही. कुटुंबात असणारे आर्थिक चाधुतर माणसांची प्रतवारी ठरून काहींना मोठं केले जाते तर काहींकडे पूर्णपणे दुर्लक्ष. ही जी मानसिक घुसमट आहे ती अनेक प्रश्नांना जन्म देते.

दादू नामक नायकाची मानसिक घुसमट 'जिणगानी' ही कथा चित्रित करते. तो एकाच वेळेस सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवर हताश होऊन वावरतो. आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी काय करता येईल, या संभ्रमात असतांना घरातील माणसे त्याला समजून घेत नाही. त्यामुळे तो घराबाहेर फेकल्या जातो. आई वडील नसतांना आपला सांभाळ मोठ्या भावाने आणि वाहिनीने करावा. दोन गोड घास खाऊ घालावे. ही त्याची सर्वसाधारण अपेक्षा आहे. परंतु त्याच्याकडूनही प्रयत्न होणे आवश्यक आहेत. ते नाहीत म्हणून तो नाकारल्या जातो. केवळ अपेक्षा आणि परावलंबन व्यक्तीला मोठं होण्यात बाधा आणत असते. हे सामाजन्याइतपत तो मोठा झालेला नाही. आपल्याला समाजातील श्रीमंतासारखे जीवन जगता आले पाहिजे असे त्याला मनोमन वाटत असले तरी त्यासाठीचे परिश्रम आपल्याकडून होत नाही याची खंतही त्याला लागून आहे. प्रत्येकाला चांगल्या जीवनाची सुखी स्वप्ने पाहण्याची मुभा आहे. कल्पनांचे मनोरे रचण्याची परवानगी आहे. परंतु या अंतर्मन ढवळून काढणाऱ्या कल्पित अवस्थामध्ये कितपत खितपत पडून राहावे हा प्रत्येकाचा प्रश्न असतो. हा गुंता जोपर्यंत 'स्व' च्या पातळीवर सोडविल्या जात नाही तोपर्यंत व्यक्ती आपले नैसर्गिक आयुष्य जगू शकत नाही. काहींना भोवतालच्या प्रश्नांना थेट भिडता येते तर, काही वास्तवाकडे पाठ फिरवून चांगल्या क्षनाची कुठलीही उर्जा खर्च न करता वाट पाहत राहतात. त्यामुळे जीवनाचा अर्थ सुटून जातो. संभ्रम, अपेक्षा आणि निराशा या टप्प्यावरूनच मानवी जीवन हे परिपूर्णतेकडे जात राहते हे समजणे महत्वाचे आहे.

आधार ही संकल्पना मानवी समाजाच्या परिप्रेक्षात महत्वाची मानली जाते.माणूस हा सामाजिक प्राणी आहे. समाजाच्या आवरणामध्ये किंबहुना आवर्तामध्ये त्याचा आदी अंत ठरलेला आसतो. याचे स्मरण असणे हे त्याच्या जिवंतपणाचे द्योतक असते. त्याची म्हणून त्याने काही एक मानसिकता तयार करून ठेवलेली असते ती म्हणजे, आपण सहकार्याशिवाय, आधाराशिवाय जगू शकत नाही . त्यामुळे ही मानसिकता जी समाजामध्ये सर्वत्र आहे त्याला माणसांपासून, समाजापासून दूर जाऊ देत नाही. आणि त्यालाही या सर्वांपासून दूर जाणे परवडत नाही. म्हणून तो आदर शोधात असतो किंवा आधार निर्माण करीत असतो.

सामाजिक चौकटीत जीवन जगणाऱ्या हरेक व्यक्तीकडे पाहण्याचा समाजाचा म्हणून एक दृष्टीकोन तयार झालेला असतो. त्याचे कारण तो ज्या सामाजिक, सांस्कृतिक,भौगोलिक, आणि आर्थिक पर्यावरणामध्ये वावरत असतो ते होय. समाजाने त्या त्या व्यक्तीच्या संदर्भात किंवा वर्गाच्या संदर्भात काढलेले निष्कर्ष योग्यच असतात असे नव्हे. काही वेळा त्यामध्ये पूर्वग्रह असण्याची दाट शक्यता असते. अशावेळेस समाजाचे असे विचार करणे चुकीचे ठरते. व्यक्ती कुठल्या वातावरणात जन्माला आली त्यापेक्षा, ती आपल्यासाठी व समाजाच्या संवर्धनासाठी काय कृती करते त्यावरून तिला ओळखल्या गेले तर, समाजातील अनेक प्रश्नांच्या तळाशी आपणास जाता येईल. त्यांना सोडवता येईल. पण ही भूमिका स्वीकारतांना समाजातील माणूस दिसतो का हा प्रश्न आहे. या प्रश्नाची उकल करण्यासाठीच साहित्याचे निर्माण कार्य होत असते. 'रहाळयाची माणसे' ही कथा माणसांना ओळखण्याची एक वेगळी कथन परंपरा व्यक्त करते. व्यक्ती ही दिखाव्यापेक्षा आचरणाने सालंकृत असली पाहिजे, आर्थिकदृष्ट्या भक्कम नसली तरी, आपल्या माणसांसाठी सातत्याने उभी राहिली तरच तिच्या प्रभेने अनेक माणसे दिपून जातील. व त्यातून नव समाजाची बीजे रोवली जातील. हे बाळकडू जेव्हा नव्या पिढीला दिले जाईल तेव्हा समाज एक वेगळी गती प्राप्त करेल. परंतु दुर्दैवाने हे समाजात घडतांना दिसून येत नाही. 'रहाळयाची माणसे' या कथेतील नायक या समाजामध्ये आपल्याला उच्चतर अवस्था कशी होईल त्यासाठी प्रयत्नरत आहे .परंतु त्याच्या या विचारला समजून न घेता त्याला डोकं नसणारा जमव तुडवून काढतो. उन्मळून पडलेल्याला 'रहाळयाची माणसे' पुन्हा उभं करतात. समाज क्रूरतेच्या पटलावरून पुढे सरकतो आहे हे भयाण वास्तव माणसांचा

विश्वास उडवणारे असेच आहे.

प्रकाश खरात यांच्या कथाविश्वाचा आढावा घेत असतांना, अनेक विषयांचा, त्यातील समस्यांचा उलगडा होत जातो. या समस्या एक तर खेड्यातील आहेत. किंवा त्या शहराच्या आश्रयाला आलेल्या तरी आहेत. तेथे विखुरलेली माणसे, हतबल झालेली माणसे, इतरांशी आपली तुलना करणारी माणसे आपल्यात असणाऱ्या उणीवांना दूर करण्याएवजी स्वत:ला दोष देत आलेला क्षण फुकट घालवत राहतात. 'मैफिल' मध्ये येणारा अनिल हे त्याचे मूर्तिमंत रूप आहे. आपल्या सधन मित्रांना हसत बागडतांना पाहून निराश होतो व दुसऱ्याक्षणी प्राप्त परीस्थीतीची उजळणी करू लागतो. दु:खाचे क्षण भोगता भोगता अनिल हा सुखाकडे दुर्मुखलेल्यासारखा पाहत राहतो. आपण गरीब आहोत असे एकदा माणसाने मानले की, तो कधीही समाधान पावत नाही. इथे आर्थिकदृष्ट्या नादारी असण्याचा प्रश्न नाही तर, प्रश्न आहे वैचारिक दृष्ट्या गरीब असण्याचा. आनंद ही बाब तुमच्या खिशात काय आहे, यापेक्षा तुमच्या डोक्यात काय आहे यावर अवलंबून असते. आणि नेमकी इथेच गफलत होत जाते व वेगळे निष्कर्ष काढायला सुरुवात होते. आपल्या वाट्यला आलेल्या कटू जीवनाच्या विरोधातला संघर्ष हा नव्वदोत्तरी कालखंडात प्रकर्षाने व्यक्त होऊ लागला. काहीतरी वेगळं हवे आहे त्यासाठीची तयारी अनेक नायकांमधून दिसून येते. मीना आणि अविनाश या मित्राद्वयांचा संघर्षही याच पातळीवरील आहे. मीना कमावती आहे आपण बेकार ही सल घेऊन वावरणाऱ्या अविनाशला मीना आर्थिक, भावनिक आधार देते. निखळ मैत्रीखातर. आर्थिकदृष्ट्या मित्राल आयुष्यात उभी करणारी मीना अपघातामध्ये मृत्यू पावते. एकार्थाने आर्थिकस्तर उंचावण्यासाठी चाललेला आटापिटा मृत्यूजवळ येऊन थांबतो. कथा केवळ सामाजिक अदमास घेत नाही तर, तिचा परिसर हा मानवी मनही आहे.

'अनिकेत' या संग्रहातील बहुतांश कथारूप हे समाजाकडून कुटुंबाकडे वळणारे आहे. कुटुंब ही त्यांची प्राथमिक गरज आहे. त्यामुळे या वाटेवरून ते समाजातील वास्तवाला पाहण्याचा प्रयत्न करतांना दिसून येतात. समाजात असणारा स्त्रियांचा दर्जा काय याच्या प्रतिक्रिया जेव्हा कुटुंबात पडू लागतात. तेव्हा स्त्री संघर्ष अनिवार्य असतो. 'कौल' ही कथा स्त्री क इनच स्त्रीवर होणारा अन्याय अधोरेखित करते. कुटुंब सत्ता विभागले जाण्याचे चित्र जेव्हा उभे राहते तेव्हा, स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठी छळवादाचे नवे सत्र सुरु होते. इतरांना न ओळखण्याचा गुन्हा होऊ लागतो. या अंतर्गत कलहामध्ये प्रल्हाद पोळून निघतो. आई, बाबा,आणि आत्या या त्रयींचा विचार करताकरता आई कुठेतरी झाकोळल्यासारखी दिसते. यातूनच मानसिक रुग्ण होऊन राहिलेल्या आईला भुताटकीचा प्रयत्न होतो तेव्हा, स्वत:ला शाबूत ठेवणाऱ्या माणसांचा आणि त्याला पाठबळ देणाऱ्या कुप्रथांचा तिटकारा आल्याशिवाय राहत नाही. मरते समई आपल्या प्रल्हादला दुवा देणारी आई अकाली हा संसार सोडून जाते. प्रल्हादच्या अंतकरणात खोलवर रुतून राहिलेली ही संवेदना त्याला बापापासून आणि आतेपासून दूर करते. प्राप्त परिस्थिती माणसांना विचारशील करते तेव्हा माणसांचे खरे चेहरे अनेक प्रश्न निर्माण करतात. या प्रश्नाच्या गुंतावळयातून स्वत:ला सोडवून घेणे धाडसाचे असते. हे धाडस या संग्रहातील नायक करतात परंतु यश त्यांच्या वाट्याला फारसे लाभत नाही. या संग्रहामध्ये प्रेमकथेचासुद्धा एक महत्वपूर्ण कप्पा आहे. पण त्याची उघड अशी अभिव्यक्ती नायकांकडून होताना फारसी दिसून येत नाही. असे असले तरी, या कथा आपली एक सभ्यता राखण्यामध्ये कमालीच्या यशस्वी होतात.

माणसांच्या संवेदनांची पाळेमुळे तो ज्या ठिकाणी उभा आहे, ती भूमी, म्हणाल तर जागा स्वत:ला भक्कम करीत असतात. त्याचे त्याच्यापुरत्या असणाऱ्या भूमीवर प्रेम असेल तर, व्यक्ती मोठ्या आत्मविश्वासाने जीवनाच्या प्रवाहाला काबीज करून त्यावर स्वार होते. पण हीच पाळेमुळे खिळखिळी वाटू लागली तर, ती व्यक्ती मुळ मातीपासूनच विलग होऊन जाते. तोडल्या जाते. नेमका हाच धागा 'अनिकेत' या कथेमध्ये गुंफलेला आहे.या कथेचा नायक आनंद एक अनाथ मुलगा आहे. कोण मुल आईवडील माहित नाही परंतु ज्याने कोणी त्याला आसरा दिला त्याच्या मृत्युनंतर सावत्र आईच्या रूपाने त्याचा मावळत्या दिशेचा प्रवास सुरु होतो. तो अकाली प्रौढ होतो.

जगण्यासाठी काम करू लागतो. त्याचा विवाह होतो. परंतु त्याला मानसातूनच काढण्याचा प्रयत्न सावत्र आई आणि बायकोकडून होतो. माणसांच्या संदर्भात माणसांच्या मनात असणारा विखार नाहीसा करण्यासाठी त्याचा प्रवास हा बुद्धाच्या दिशेने सुरु होतो. अनैतिकता ही सामाजिक विकृती जन्माला घालण्यास जेव्हा कारणीभूत होत असते, तेव्हा मानवी मनाचा एक विचारी कोपरा सावधतेने पावलं टाकण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि हाच त्याच्या मानाने त्याला दिलेला प्रतिसाद असतो. याची जाणीव या कथांमधून प्रकर्षाने व्यक्त होते. अनैतिकतेच्या आणि अवाजवी अपेक्षांच्या आड जर कुणी येत असेल तर, प्रसंगी त्यालाही ओलांडून पुढे जाणारी प्रवृत्ती ही प्रत्येक काळाचे बोट धरून उभी राहत असते. ती या कथेत दिसत असली तर, त्यात नवल वाटण्याचे काही एक कारण नाही. ही सहजता, स्वाभाविकता प्रकाश खरात यांच्या कथेचे बलस्थान ठरते.

**निष्कर्ष :**

अनिकेत हा कथासंग्रह समाजातील आर्थिक दरी स्पष्ट करतो.

समाजातील सांस्कृतिक संघर्ष माणसांमध्ये दुफळी निर्माण करण्यास साह्यभूत ठरतो.

व्यक्तीच्या उपयोगितेला सलाम करणारी अवस्था इथे निर्माण झालेली दिसून येते.

प्रेमाचा ओलावा शोधून आयुष्यात मोठ्या सन्मानानेउभी राहणारी माणसे लक्ष वेधतात.

शिक्षणाचा विचार समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचलेला दिसून येतो.

**संदर्भ :**


अनिकेत : प्रकाश खरात, भिमस्मृती प्रकाशन, मालाड (प) मुंबई

मराठी वांग्मयाचा इतिहास : रा.ग. जाधव, खंड ७ , भाग ३ मसाप.

आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता : संपा. मृणालिनी शहा, विद्यागौरी टिळक, पद्मगंध प्रकाशन, पुणे.

निवडक समीक्षा: रा.ग. जाधव, पद्मगंध प्रकाशन, पुणे.


**28**

# "समकालीन कहानियों में चित्रित विविध सामाजिक समस्याएँ"


**डॉ. विनय सु. चौधरी**

शोध निर्देशक,

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर

**विजय वडवराव**

शोध-छात्र,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय, औरंगाबाद


***********

**विषय प्रतिपादन :**

हिंदी साहित्य की विभिन्न विधाओं में जीवन की अनेक समस्याओं का प्रधान एवं गौण रूप में चित्रण हुआ है। व्यक्ति, परिवार एवं राष्ट्र के परिप्रेक्ष्य में 'समाज' एक महत्वपूर्ण एवं सशक्त इकाई है। विभिन्न व्यक्तियों के समूह या समुदाय का नाम ही समाज है। अत: समाज की सामाजिक समस्याएँ साहित्य में उभर कर आती है। वर्तमान युग समस्याओं का युग है। आज प्रत्येक व्यक्ति के जीवन और परिवेश में व्यापक परिवर्तन आया है। प्राचीन जीवन मूल्यों के टूटने एवं नये मूल्यों के बनने में काफी समय लगता है। इस संक्रमण काल में भ्रमात्मकता, अस्थिरता, संघर्ष आदि का प्रादुर्भाव होता है। जिसके कारण अनेक समस्याओं का जन्म होता है। ऐसी समस्याएँ निरंतर बढ़ती जाती है। यथा भारत की बढ़ती आबादी से उत्पन्न बेरोजगारी, अनुशासन हीनता, आर्थिक विषमता आदि समस्याओं ने विकराल रूप धारण कर लिया है। उसी प्रकार दहेज प्रथा, विधवा नारी की दयनिय अवस्था, नारी शिक्षा, भ्रष्टाचार, बूढ़ो का दुख: आदि समस्याएँ हैं।

हिंदी कथा साहित्य में अनेक समस्याओं को चित्रित किया गया है लेकिन इस आलेख में केवल हिंदी की नई कहानियों में चित्रित सामाजिक समस्याओं को लिया गया है।

**भ्रष्टाचार की समस्या :**

आज सभी जगह शोषण, अनाचार, भ्रष्टाचार का रूप इतना भयावह है कि नई कहानी अभी उसकी कुछ परतें ही खोल पायी है।

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

Revised Edition

26) सकारात्मक मानसशास्त्रात घडलेल्या ऐतिहासिक घटनांचा संक्षिप्त आढावा:सन १९८४-२०१२
**डॉ. एन. एस. डोंगरे, जि. धुळे** ||136

27) दहशतवाद : भारतासमोरील एक आव्हान
**प्रा.राऊलवाड जी. जी., जि. नांदेड** ||142

28) अहिल्याबाई होळकर यांचे वंचीत घटकासाठी योगदान
**व्हडगीर रामप्रसाद मोहनराव, हिंगोली** ||143

29) मानवतेचा पुरस्कार करणारी कविता : माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी
**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे, शेगांव** ||146

30) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
**प्रा. मारोती उध्दवराव टिपले, जि. गडचिरोली** ||150

31) उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत
**डॉक्टर किशन यादव जी & रश्मि जोशी, झांसी (उत्तर प्रदेश)** ||153

32) शांकर शिवस्तोत्रो में तत्वमींमासा
**Prof. Arvindbhai J. Talpada, Dist .- Aravalli** ||156

33) ओम क्रांति क्रांति नाटक में अभिव्यक्त भ्रष्ट शिक्षा व्यवस्था
**डॉ. संगीता श. उप्पे, घोणसी** ||159

34) मानवाधिकार की संकल्पना : एक समीक्षा
**डॉ० दीर्घपाल सिंह भण्डारी, नई टिहरी, (टि०ग०)** ||164

35) भारत में समाज सुधारकों का इतिहास
**जय प्रकाश** ||170

36) विज्ञापन की व्यावसायिक सत्ता: एक अध्ययन
**Ujjwal S. Kadode** ||174

37) रमणिका गुप्ता के यात्रा वृत्तांत 'लहरों की लय' में प्राकृतिक सौन्दर्य का चित्रण
**मीनल मेहना, उज्जैन** ||178

http://www.printingarea.blogspot.com
www.vidyawarta.com/03

५. लोकमाता अहिल्याबाई होळकर (गौरवग्रंथ) - प्रा. धनंजय बेडदे, विद्याभारती प्रकाशन, लातुर पृ. १६२

६. कित्ता, पृ. १६३

७. कित्ता, पृ. १७३ व १७४.

८. दै. लोकसत्ता - ३१ मे २०१६ पृ. १८

९. अहिल्याराज साप्ताहिक संपा. दत्ता वाकसे पृ. १८

१०. लोकमाता अहिल्याबाई होळकर (गौरवग्रंथ) - संपादक अॅड महेंद्र शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २०१४ पृ. १९२

११. कित्ता, १९७

१२. अहिल्याबाई होळकर - विनया खडपेकर, राजहंस प्रकाशन, पुणे पृ. १४५

१३. लोकमाता अहिल्याबाई होळकर (गौरवग्रंथ) - संपादक अॅड महेंद्र शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २०१४ पृ. १२

❑❑❑

**29**

# मानवतेचा पुरस्कार करणारी कविता : माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी

**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि. मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय, शेगांव

***********

कवी अशोक वि. शिरसाट यांचा माणुसकीच्या दुबार पैरणीसाठी हा दुसरा काव्यसंग्रह आहे. याआधी त्यांच्या लेखणीतून उतरलेला उधाण हा काव्यसंग्रह आहे. या संग्रहाने त्यांना कवी म्हणून एक नवी ओळख प्राप्त करून दिली. प्रत्येकाला माणूस म्हणून एक ओळख असतेच. परंतु स्वकतर्ईत्वाच्या आणि प्रज्ञेच्या बळावर व्यक्तिला त्याची दुसरी ओळख प्राप्त होते. वेगळे नाव प्राप्त होते. या नावाला समाज आदराने विचारतो, संबोधतो. हा प्रवास इथेच संपत नाही तर, ही त्या—त्या सर्व प्रतिभावंतांची ती सुरुवात असते. प्रारंभ असतो. नव्या प्रांताला समजून आणि समजावून सांगण्याचा की ज्यापासून सर्वसामान्य माणूस पूर्णपणे अनभिज्ञ असतो ज्याचा प्रश्न भुकेतून सुरू होतो आणि भाकरीपर्यंत येऊन पोहोचतो. ती महत्त्वपूर्ण वाट कवी अशोक शिरसाट यांनी चांगल्यापैकी चोखाळलेली आहे यात तिळमात्र शंका नाही. उद्याण या काव्यसंग्रहाचे महाराष्ट्रभर कौतुक झाल्यानंतर त्यांचा माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी हा काव्यसंग्रह आनंद प्रकाशन, औरंगाबाद यांनी प्रकाशित केला. या काव्यसंग्रहाला अनेक पुरस्कार प्राप्त झाले. एकार्थाने त्यांच्या प्रतिभेचा हा गौरव आहे असे म्हणावे लागेल, या संग्रहामध्ये एकूण एकोणसाठ कविता आहेत. त्यामध्ये त्यांनी काव्याचे वेगवेगळे प्रकार अगदी दमदारपणे हाताळलेले आहे. परिवर्तनाचा ध्यास हा एकूणच त्यांच्या कवितासंग्रहाचा विशेष सांगावा लागेल. त्याच्या कविता अगदी साध्या भाषेत आणि सोप्या प्रतिमांमधून व्यक्त होऊन आपल्या उद्देशाला सफल करतात. कुठलीही

आत्मप्रौढी, तसेच भाषेची शेखी ते मिरवत नाहीत. पांडित्याचा आवही त्यांच्या कवितेला मलीन करीत नाही. त्यामुळे ही कविता अगदी नैसर्गिक होते. सहज होते.

माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी हा काव्यसंग्रह दलित साहित्याशी आपले नाते व्यक्त करतो. नव्हे ही त्यांची दलित कविता आहे. या कवितेचं प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. हा प्रेरणास्त्रोत या कवितांमधून अखंडपणे वाहताना दिसतो. २०१२ हे या काव्यसंग्रहाचे प्रकाशनवर्ष आहे. म्हणजेच ही कविता नव्वदोत्तरी कालखंडामध्ये जन्माला येते. नव्वदच्या पुढे पुढे बदललेलं सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि भौगोलिक वातावरण माणसांना अंतर्मुख करू लागलं. माणसे विचारप्रवृत्त झाली. बरं काय? मागचं की आताचं? हा प्रश्न जगण्याच्या निकडीतून उद्यास आला. तुलना सुरू झाली. सोबतच भोवतालाबद्दल संशय निर्माण झाला व माणूस एककेंद्री झाला. त्याचे असे एककल्ली होणे हे आणखी भयावह होते. पण हे नव्वदोत्तरी पर्यावरण त्याच्या गतीनुसार माणसांच्या जगण्याच्या साऱ्या शक्यतांना काबीज करत गेलं. याच्या संवेदना माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी या काव्यसंग्रहातून व्यक्त झाल्या आहेत.

पारंपरिक मराठी साहित्याने खऱ्या जीवनजाणिवा साहित्यामधून व्यक्त केल्याच नाही, हे अगदी बरोबर आहे. त्यांच्या पाहण्यात, भोगण्यात जे प्रश्न होते, समस्या होत्या, असतील तर ते त्यांनी अगदी चघळतपणे कथा, कादंबरी, नाट्य, काव्य इ. प्रकारांमधून अगदी इमाने इतबारे मांडलेत. परंतु याच्या पलिकडेही एक अभावग्रस्त विश्व असते याची जाणीव या साहित्याला झाली नाही, असे ठामपणे म्हणता येत नाही. ज्या समाजात माणूस राहत असतो त्यातील बऱ्या—वाईटाकडे त्याचे लक्ष जातेच. परंतु कोणात्या — कोणत्या गोष्टींची नोंद घ्यावी हे सर्वस्व त्याच्यावर अवलंबून असते. त्यामुळे जाणीवपूर्वक गावकुसाबाहेर असलेल्या भुके—कंगाल माणसांचा विचार या साहित्याने केला नाही. त्यांचा उद्‌गार, त्यांच्या वेदना, त्यांची ठणक साहित्यातून आली नाही. परंतु या वाढलेल्या, चिरडलेल्या वेदनांचा प्रदेश साठोत्तरी काळखंडातील दलित साहित्याने जिवंत केला. हा प्रवाह पारंपरिक साहित्याची दातखिळ बसवणारा व त्यांच्या मर्यादा व्यक्त करणारा होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही या साहित्याची प्रेरणा होती. या प्रेरणेतून कथा, स्वकथन, कादंबरी, कविता असे अनेक वाङ्मयीन प्रकार सामाजिक वास्तव मांडू लागले. त्यातल्यात्यात नामदेव ढसाळांच्या माध्यमातून दलित कविता घराघरा पोहोचली. कवितेची खरी अभिव्यक्ती काय असते याचा पाठच जणू ढसाळांनी एकूणच मराठी कवितेला दिला. प्रस्थापित मराठी साहित्याने या कवितेला केलेला विरोध हा त्यांची क्षमता व्यक्त करणाराच होता. परंतु कुठल्याही टीकोला न जुमानता दलित कवितेने खरे समाजमन मांडण्याचा प्रयत्न केला. यातूनच इथे अनेक दमदार कवी दलित कवितेतून नावारुपास आले, त्यामध्ये नामदेव ढसाळ, कमन निंबाळकर, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम त्र्यंबक सपकाळे, अर्जुन इंगळे, ज. वि. पवार, इ. हे या कवितेचा पायी होते. त्याच्या तळाशी जातस्तर हा महत्त्वाचा भाग होता. त्या विरोधातील हा संघर्ष होता. माणूस म्हणून जिवंत राहण्यासाठीची ही लढाई होती. परंतु नव्वदोत्तरी कालखंडातील आशयाभिव्यक्ती ही स्पष्टपणे वेगळी असलेली पाहायला मिळते. शिक्षणाचा प्रसार आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये उपलब्ध असणाऱ्या संधी नव्या पिढीला मिळू लागल्या. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू लागला. परंतु या नव्या पिढीच्या बदललेल्या विचारांना समाजातून विरोध होत गेला. तो का आणि कसा याचे स्वरूप दलित कवितेने स्पष्ट केले आहे. त्यात कवी शिरसाट महत्त्वाची भूमिका बजावतात.

'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा महत्त्वाचा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाला दिला. आणि माणसे प्रसंगी उपाशी राहून आपल्या लेकरांना शिकवू लागली. शिक्षणाच्या संचाराने समग्र दलित समाज उजळून निघाला. आपला इतिहास बदलू लागला. एका नव्या परंपरेची रुजुवात झाली. केशवसुतांच्या शब्दांमध्ये जुने जाऊद्या मरणालागुनी हे चित्र कवितेमधून व्यक्त झाले, आर्थिक आणि शैक्षणिक स्तर उंचावला असला तरी अनेक प्रश्न नव्या स्वरूपात निर्माण झाले. या नव्या प्रश्नांशी विचाराच्याव्दारे पुढे

येण्याचा प्रयत्न नव्वदोत्तरी कविता करू लागली. किंबहुना नव्वदोत्तरी कवितेने केला. ही कविता बदलत्या पर्यावरणाला प्रश्न करते ती म्हणते, बाबासाहेब, या देशात, माणसचं माणसांना पुसत नाहीत, इतकं पीक आलंय हायब्रीडचं की, गावरान डोळ्यानेही दिसत नाही!, माती नाही, नीती नाही. आपल्या विचार भावना व्यक्त करण्याची एक महत्त्वाची जागा म्हणजे कविती आहे. तिला काळाच्या मर्यादा पडत नाही. ती अव्याहत व्यक्त होते. निरंतर नवे विचार प्रसवणे हा तिचा स्थायीभाव होऊन जातो. इथे कवीचा उद्‌गार हा खंत व्यक्त करतो. जो सर्वसामान्य माणसाचा आहे. परंतु तो व्यक्त होऊ शकत नाही. अशा माणसांचे शब्द कवी होतो. बाबासाहेबांच्या त्यागाने, विचाराने प्रभावित होऊन इथला प्रत्येक दलित शिकला. मोठा झाला. कारण त्याच्या डोळयापुढे बाबासाहेबांचे कर्तृत्व होते, त्यामुळे तो पुढेच पुढे चालत होता. बाबासाहेब समाजासाठी, देशासाठी जगले याकडे कवी आपके कक्ष केंद्रित करतात. त्याचे कारण शिकलेला, पैशाने मोठा झालेला जातीतीलच नेता समाजाला फसवू लागला. आर्थिक, मानसिक, शारीरिक इ. पातळयांवर आपल्याच माणसांचा गुन्हेगार होऊ लागला, ही राजकीय पिलावळ पोटासाठीच्या कोरभर तुकड्यासाठी रक्त नसलेल्या माणसांचे शोषण करू लागली. स्वत:ला मोठे करण्यासाठी, पोटाची कायम व्यवस्था करण्यासाठी प्रसंगी आपल्यासकट समग्र समाजाला दुसऱ्याच्या दावणीला बांधू लागली. अत्यंत लाचारीने जगू लागली. आत्मसन्मान गमावून बसलेली पिढी बाबासाहेबांना नको होती. याची जाणीव या कवितेतून जशी होत जाते तशीच अंतर्गत निर्माण झालेली राजकीय नेतृत्वाची लढाई समाजाला विभागून टाकली आहे. गटातटामध्ये नवे नेतृत्व हरवले आहे. चळवळ संपली आणि चढाओढ निर्माण झाली. हे वास्तव दलित कवितेतून प्रकर्षाने येत आहे. इथे दलितेतरांबद्दलचा केवळ विरोध नाही तर दलितांतर्गतचाही संघर्ष आहे. त्याची चिरफाड आहे. लढाई या कवितेत कवी सूचकपणे व्यक्त होतो जे असे, बुद्धत्वाची शपथ देणाऱ्या, डॉक्टर बाबासाहेबांची लढाई, वाऱ्यांवर विरत चाललीय जणू गड्या हो!, आंध—बावणे— कोचरे—लाडवण— सोमवंशी, हातात सांडेबारा जातींचे नगारे घेऊन, आपसातच झगडत आहेत या काव्यसंग्रहातील बऱ्याच कविता हया गटातटातल्या हरवलेल्या, अस्मिता गमावलेल्या राजकीय नेतृत्वाला तुटून पडतात. तुटून पडणे हा त्यांना आपला अधिकारच वाटतो, कारण बाबासाहेबानंतर अगदी विश्वासाने ज्या नेतृत्वावर अवघा समाज हा निश्चिंत होता, त्यांनी कमालीची निराशा केली. मग कोणाकडे बघावे हा प्रश्न इथल्या माणसाला पडू लागला आहे./ अशावेळेस कोणावर विश्वास ठेवावा भीती सर्वसामान्यांना वाटू लागली आहे. ही भयग्रस्तता या कवितेने मांडली आहे.

'माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी' या काव्यसंग्रहाचे विषय हे सिमित झालेले नाहीत. त्यामध्ये वेगवेगळ्या विषयांच्या अनेक कविता आहेत. केवळ जातीचेच तुणतुणे कवी वाजवत हा काव्यसंग्रह संपवत नाही. या समाजात निर्माण झालेला असंतोषाचा, विध्वंसनाचा सारा कचरा ते स्वच्छ करीत जातात कारण त्यांनी मानवतेची पेरणी करायची आहे. नवनिर्माण हेच त्यांचे अंतिम ध्येय आहे. आणि या ध्येयापर्यंत कवी पोहचतो. या संग्रहातील दंगल ही कविता वेगळा आशय घेऊन येते. वेगळया परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनाची शोकांतिका ती हेरते. हरेक वर्षी बेईमानीचं तणकट, अन् पारतंत्र्याचं पीक पाणी, तोंडचा घास पळवत आलय, ओस पडलेल्या जमिनीची नित्य मशागत करणारा बळीराजा, भोगत आला सोसत आला 'उन्हातान्हात'. साठोत्तरी काळखंडातील शेतकऱ्याच्या जीवनाचा संदर्भ ग्रामीण साहित्यातून अत्यंत पोटतिडकीने आलेला आहे. त्याचे कालचे आणि आजचे जगण्याचे सुत्र कसे बदलत चाललेले आहे हे कादंबरीतून, कवितेतून व्यक्त झालेले आहे. परंतु नव्वदोत्तर कालखंडात जागतिकीकरणाच्या माध्यमातून खेड्यावर झालेला परिणाम सर्वांगाने चांगलाच होता असे ठामपणे म्हणता येत नाही. त्याचे खोलवर परिणाम शेतकरी जीवनावर झालेत. नवे यंत्र आलीत, बी, बियाणे, खत, औषधे इ. च्या वापरातून तो आपल्या वावरात पारंपरिक पिकाऐवजी नवे प्रयोग करू लागला. परंतु असे सर्वांच्या बाबतीत शक्य नव्हते. या सर्वासाठी आवश्यक असणारा पैसा तो उभी करू शकला नाही. यातून त्याची पावलं बँकेच्या, पतसंस्थांच्या, सावकारांच्या पायऱ्या झिजवू लागली. पण व्यापाऱ्यापुढे, सरकारसमोर तो टिकू शकला नाही. यातून निर्माण झालेल्या निराशेने तो काळवंडून गेला व त्याने आपले जीवन संपवून टाकले ते

आत्महत्येने. शेतकऱ्यांच्या संदर्भातील जागतिकीकरणातील आत्महत्या ही फार मोठी घटना आहे. पण अजूनही त्याच्या जीवावर रोट्या तोडणारी, सत्ता भोगणारी माणसे त्याच्या नावाचा वापर तेवढा ईमानदारीने करत आहेत.

व्यक्तिविशेष हा एक महत्त्वाचा भाग या काव्यसंगात आहे. छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे, सावित्रीबाई फुले, गाडगेबाबा, मदर तेरेस इ.ना या समाजावर जे मानवतेचे संस्कार केले त्यांचे स्मरण प्रत्येक काळखंडामध्ये होणे किती आवश्यक आहे याचे गांभीर्य माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी ही कविता व्यक्त करते. पेरणी ही संकल्पना सृजनाचं द्योतक आहे. जिथे जुने टाकावू झाले आहे तिथल्या अवस्थेला निर्माणाचे स्वप्न पडले पाहिजे. कालौघात मानवतेचा, बंधुतेचा विचार जाणिवपूर्वक डावलून माणसांना जाती–पातीच्या, धर्माच्या नावाने पंगू केले जाते तिथे क्रांतीचा उद्घोष होणे गरजेचे असते ही सद्भावनी कविता प्रकट करते, या नैसर्गिक आपत्तीच्या आक्रोशात, उद्ध्वस्त झालेल्या पाखरांना, गड्या हो कवेत घ्यावे, आणि माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी, घराघरातून क्रांतीकारी हात पुढे यावेत.' किंबहुना, 'द्वेष मत्सराने बुरसटलेला जेम्स लेन, तुझी पोकळ छाती अन् मेंदूतल्या विषारी ज्वाला, नुसत्या गरळ ओकायला लागल्यात, बा शिवरायांसाठी' किंवा 'कालची शेण फेकणारी, कलह माजवणारी, विषारी प्रवश्त्ती, निस्तेज करून टाकलीस, आपल्या तेजोमय ज्योतीने स्त्रियांना दिलीस स्त्रीत्वाची अनुभूती अन्, माणुसकीचा अनमोल दागिना तूच. किंवा बाबा, तुझी पावलं जीर्ण मैदानावर पडताच, पुंड्यांनी आपोआपच पेट घेतलाय, फाटलेल्या आभाळाला, ठिगळं लावत– लावत, आटलेल्या मानवतेला, झरा फोडलास तू माणुसकीचा किंवा अण्णा, तुम्ही हातात लेखणी घेतली अन्, सवर्णाच्या हातातली लेखणी बोथट झाली. किंवा या मातीतलं, विषारी दुःखाचं गाठोडं, शेवटी तेही लपेटून नेलस, आपल्या अंगभर वस्त्रात!, हे मदर तेरेसा, आता थरथरणारे, माऊलीपणाचे हात, शोधू तरी कुठे?' मानवतेची एक अखंड परंपरा या समाजाला आहे. थोर महात्म्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर सामान्य माणसांना त्यांच्या हक्कापर्यंत, ध्येयापर्यंत नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्या वैश्विक न्यायाने समश्द्ध असणाऱ्या विचारांना /परंपरेला गालबोट लागताना समाजात जेव्हा दिसून येते तेव्हा कवी पेटून उठतो व त्या

दलित कविता ही सातत्याने समाजातील वाईटाला विरोध करीत आली आहे. समाजातील सामान्यांना आपल्या हितासाठी राबविणाऱ्यांचे विद्रुप चेहरे टिपत आली आहे. कारण ती चळवळीतून निर्माण झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तिची प्रेरणा आहे. भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांच्या स्थिती गतीचा ती विचार करते. व त्यानुसार ती आपलं पुढचं पाऊल निश्चित करते, कवी अशोक शिरसाट यांच्या कवितेच्या संदर्भात आपणास हेच म्हणता येईल. निसर्गतः महत्त्व प्राप्त झालेल्या प्रत्येकाला सन्मानाने जगता आले पाहिजे हा स्वर ती व्यक्त करते. या कवितेमधून वर्तमानातील काही दाहक विषयांनाही स्पर्श होऊ शकला असता, परंतु त्याचा ओझरता उल्लेख करून कवी पुढे जातात. असे असले तरी, त्यांच्या कवितेचे सामर्थ्य कमी होत नाही. ती दलित कवितेच्या प्रांतात आपलं एक वेगळं स्थान निर्माण करते एवढे मात्र निश्चित.

**निष्कर्ष:**

१) ही कविता दबलेल्या, अन्यायग्रस्त माणसांचा आवाज बुलंद करते.

२) प्रस्थापित मराठी कवितेला दलित कवितेने दिलेले हे उत्तर आहे

३) अनेक सामाजिक संदर्भाच्या अंगाने कविता फुलत जाते. घडत जाते.

४) माणूस टिकला पाहिजे हा या कवितेचा उद्गार व्यक्त होतो.

५) साधेपण हा या कवितेचा स्वभाव व्यक्त करतो.

६) आशयसौंदर्य पडकण्यात कवी कमालीचा यशस्वी झाला आहे.

**संदर्भ :**

१) मराठी वाङ्मयाचा इतिहासः– संपा. रा.ग. जाधव, मसाप, पुणे खंड सातवा भाग दुसरा, १९५० ते २०००

२) माणुसकीच्या दुबार पेरणीसाठी :– अशोक शिरसार, आनंद प्रकाशन, औरंगाबाद

३) ग्रामीण–दलित साहित्य : चळवळ आणि समीक्षा –डॉ. मधुकर मोकाशी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

४) ग्रामीण दलित साहित्याचा अनुबंध – संपा. डॉ. म. सु. पगारे, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

ISSN 2394-5303

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया™

Editor
Dr.Bapu G.Gholap



www.vidyawarta.com

14) Impact of Ì-commerce in India
**Dr. Kotgire Manisha, Dist. Aurangabad** ||61

15) Gandhian writing
**Dr. Rashmi Nagwanshi** ||64

16) Sexual Harassment of women at the work place
**Mr. Sunil Kumar Sharma, Bilasipara, Dhubri (Assam)** ||65

17) Impact of the Indian Culture on South-East Asia
**Dr. Md. Shamsuddin Mallick, University of Calcutta** ||69

18) केळी उत्पादन आणि विपणनात मोबाईल तंत्रज्ञानाचा वापर
**जनार्दन जानजी देवरे, जळगाव** ||76

19) हुंडा पध्दतीबाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनींचा दृष्टिकोन
**डॉ. ज्योती शेषराव दिघाडे, अमरावती** ||78

20) राम जोशी यांची लौकिक शृंगारिक लावणी
**प्रा. जाधव दिलीप रामचंद्रराव, जि. नांदेड** ||84

21) भारतातील भुमीहीन मजुरांच्या समस्या व उपाय
**प्रा. डॉ. बी. आर. शिंदे, जि. परभणी** ||86

22) मराठी बालकवितेचे स्वरूप अंतरंग
**प्रा. गजानन आनंता देवकर, जि. नांदेड** ||89

23) वर्तमानाची आव्हाने पेलणाऱ्या पोशिंद्यांची कविता
**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे, शेगांव** ||92

24) पंचायतो में महिलाओं की राजनैतिक भूमिका
**अनुताष कुमार, बादलपुर** ||95

25) भारतीय कृषि : उपलब्धियाँ और नए उपाय
**डॉ. शेखर मैदमवार, उज्जैन (म.प्र.)** ||99

26) देवेंद्र आर्य की कविता में जीवन मूल्यों का दायित्व बोध
**डॉ. अर्जुन के. तडवी, पाटण** ||105



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

23

# वर्तमानाची आव्हाने पेलणाऱ्या पोशिंद्यांची कविता

**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि. मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय, शेगांव

************

निसर्ग आणि कृषीसंस्कृती यांचा एक सनातन संबंध आहे. निसर्गाच्या खाणाखुणा कृषीवलांच्या अंगाखांद्यावर मोठ्या सन्मानाने उमटलेल्या दिसून येतात. किंबहुना हाच खट्याळ निसर्ग त्याच्या एकप्रकारे त्यांच्या जीवनाचा सखा म्हणूनच, त्यांच्या अंगभर, मनभर जीवनाचा ताबा घेऊन, मोठ्या अभिमानाने त्याच्यात बिनदिक्कतपणे वावरत असतो. त्याचे असे वावरणे कृषीसंस्कृतीला सौख्याचे, आनंदाचे आणि अभिमानाचे वाटत असते. कृषीसंस्कृतीत जन्मापासून मरेपर्यंत उभ्या राहणाऱ्या माणसाला निसर्गाला टाळून आपल्या जीवनाचे सुंदर गीत रचता येत नाही. गाता येत नाही. जगता येत नाही. निसर्गाचे सुरेल किंवा कर्कश अवतरणे हे त्यांच्या आयुष्याचं प्राक्तनच म्हणावं लागते, असे असले तरीही, कुठलीही नकारघंटा न वाजवता, पळ काढता त्याला पुरता पेलण्याचाच प्रयत्न दिसून येतो. हे वेगळेपण त्या शेतीतून नावारूपास आलेल्या त्या शेतकऱ्याचं म्हणावे लागेल. एकप्रकारे सातत्याने संघर्षरत असणारी त्या शेतकऱ्याची अभिव्यक्ती आपणास पाहावयास मिळते.

शेती, शेतकरी आणि संघर्ष ही त्रिसूती अव्याहतपणे ग्रामीण साहित्यातून व्यक्त होत आली आहे. हे अलिकडच्या साहित्याच्या संदर्भात आपणास अधिकाराने म्हणता येईल. त्याआधी तर त्याच्या जीवनाला आणि त्याला व्यापून असणाऱ्या निसर्गाला रूचीपालटाच्या, आणि करमणुकीच्या अंगानेच साहित्यात कोंबून नावारूपास येणाचा जिकिरीचा प्रयत्न झालेला दिसून येतो. असे का झाले हा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा त्यामागील काही सामाजिक संदर्भ तपासावे लागतील. ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाची जी उतरंड आपणास दिसते ती अमानुष असणे. साहित्याचे काही निकष ठरवणे. नायकाबद्दलच्या काही समजूती असणे, साहित्याचे नेमके विषय असणे, हे साऱ्या निकषांनी ठरवणाऱ्यांना खरी प्रतिभा पाहण्याची ताकद कधी स्वत:मध्ये निर्माणच केली नाही. होऊ दिली नाही. होणार नाही याची काळजी घेतली. त्यामुळे वास्तवाशी खरा संवाद साधणारं ग्रामीण साहित्य निर्माणच होऊ शकलं नाही. अपवाद महात्मा ज्योतिबा फुले यांचा देता येईल. ज्योतिबांनी कृषीवलांच्या नेमक्या दुखण्यालाच स्पर्श केला आणि त्यांनी बोलतं केले. त्याला बोलकं करणं ही महत्त्वाची भूमिका फुल्यांची होती. त्याने शतकानुशतकांच्या दाबून ठेवलेला हुंदका, उद्गार त्यांच्या साहित्यातून व्यक्त झाला. त्यानंतर एकप्रकारे ग्रामीण या संकल्पनेच्या माध्यमातून आनंदी आनंदच कोसळत गेला. येत गेला. तो भेट स्वातंत्र्योत्तर कालखंडापर्यंत. ही जी प्रज्ञेची नादारी आहे ती वास्तविक दूर केली ती नव्वदोत्तरी कालखंडात मोठ्या हिमतीने व्यक्त झालेल्या ग्रामीण साहित्याने, कथेने, कादंबरीने आणि कवितें. कारण या प्रांतानेच इथल्या प्रज्ञावंतांना जन्माला घातले होतें. त्यामुळे त्या वातावरणाचा परिमळ त्यांच्या श्वासांगातून दरवळत राहिला तो कवितेच्या बोलीतून. कारण कृषीसंस्कृतीतील लेकरूच स्वत: निसर्गाची गाणी गायला लगें व परंपरांगत, पारंपरिक मराठी साहित्य अतंर्मुख झाले. त्यांचं असं होणं ही इथल्या वातावरणाची अत्यंत निकड होती.

ग्रामीण समाज आणि त्याची महत्त्वपूर्ण भूमिका जेव्हा विकासाच्या पटलावर अधोरेखित होऊ लागली तेव्हा, उर्जाहीन साहित्यात त्याची दखल घेतल्या जाऊ लागली. ती सुध्दा उपऱ्या स्वरूपात. काही का असेना निसर्गाला समृद्ध करणाऱ्या माणसांनी लेखनीचा विषय केल्या जाऊ लागला. ते त्यांच्या दिसणाऱ्या दैनंदिन जगण्याच्या पध्दतीच्या माध्यमातून तो केवळ बाह्यंगाने साहित्यात दिसू लागला. कदाचित आरोग्याला जपणाऱ्यांसाठी तो वातावरण बदलाचा प्रयोग असेल. परंतु ग्रामीण समाज साहित्यामध्ये येऊ लागला. हे खरे आहे. त्यांचा पेहराव, खानपान, आचार, विचार, त्याची

भाषा, सण समारंभ, संस्कृती, जातस्तर, कुटुंबपद्धती आणि इतर गोष्टींनी परिपूर्ण असणारा ग्रामिण माणूस स्वातंत्र्यपूर्व काळात गंमतीचा, मनोरंजनाचा भाग म्हणूनच आलेला आहे. जोपर्यंत त्याला त्यांचे खरे सुत्रधार मिळाले नाही तोपर्यंत, स्वातंत्र्योत्तर त्याच्या बदलाच्या संकेताची तीव्रपणे जाणीव होऊ लागली. त्याला त्याच्या वास्तविक जीवनासहीत आणण्याचा प्रयत्न करणारी अनेक साहित्यिक मंडळी दिसून येईल. त्यांचा या समाजाप्रती असणारा प्रयत्न हा खरा होती. कारण त्यांच्या जगण्याला इथल्या काळ्या मायच्या उर्जेनं समृद्ध करून सोडलं होतं. या मातीशी, समाजाशी त्यांची नाळ जुळलेली होती.मोठ्या अवकाशानंतर येथून प्रारंभ पोवला या समाजाचा उद्गार साहित्यातून एक वेग त्याला प्राप्त झाला. शिक्षण या ग्रामापर्यंत येऊन पोहचलं होतं. त्याच्या दूरगामी परिणामांची त्यांनी जाणीव होऊ लागली. ढोरमेहनत करून आयुष्यात जागजागी डोबले पाडून घेतलेल्या माणसांनी आपल्या पोटी उगवलेल्या नव्या पिढीची पेरणी शिक्षणाच्या अंगाने सुरु केली. इथून त्यांच्याकडून घेतल्या जाणारं पिक हे वेगळं होते. हृदयाकडून डोक्यापर्यंतचा प्रवास सुरू झाला. त्याची फळं अल्पावधीत मिळायला सुरुवात झाली. निसर्ग, सरकार, सावकारी करणाऱ्या आणि कणवाळूपणाचा आव आणून शेतकऱ्यांचा लचका तोडणाऱ्या सहकारी संस्था यांचा खरा 'गेम' नव्या सूत्रधारांना कळायला लागला, आणि शोषणाला नवे तोंड फुट लागले. नवी पिटी चौफेर विचार करू लागली. विचार हे त्यांचे नवे अस्त्र होते. गावकीबद्दलचा जिव्हाळा आणि भविष्याला नवे वळण देण्याची त्याची दृष्टी प्रस्थापित मराठी साहित्यिकांना स्तंभित करून दिली. याचे नायक, विषय, वास्तव वेगळं होतं. केवळ समर्पण, त्याग परिभाषा विरळ होऊ लागली. त्याऐवजी नव्हार, आत्मशोध आवर्जून फुटू लागला होता आणि हीच नव्वदोत्तरी कालखंडातील ग्रामीण कवितेची अभिव्यक्ती होती.

शेती, शेतकरी आणि कुटुंब ही शक्तीस्थळं ग्रामीण कवितेतून प्रकर्षाने दिसून येतात. कुटुंबाचा कणा जशी शेती आहे. तसाच शेतकरीही आहे. शेती फुलविण्यासाठी. इथे फुलविण्याचा संबंध दृष्टीतृप्ततेसाठी नाही तर चार—दोन पोटांच्या इंधनाची सोय लावण्यासाठी असा घेता येईल. तो धडपत असतो. तो एकाच वेळेस, पोशिंदा असतो, शेतकरी राजा, बीराजा पोषणकर्ता अथवा बाप असतो. याची जाणीव त्याला असते, म्हणूनच तर त्याच्या पायाला भिंग्रया असतात. तो कोणत्याही एका ठिकाणी थांबू शकत नाही. थांबणे हे त्याचं प्राक्तनच नाही. थांबळेपणाला स्विकारून आपल्या माणसांच्या रोशाचा तो गुन्हेगार होऊ इच्छित नाही. इथे जबरदस्ती नाही. तो सर्वांझाने मुक्त आहे. स्वतंत्र आहे. असतो. परंतु कुटुंब ही त्याची प्राथमिक जबाबदारी असल्याने तो स्वत:ला त्या भावतंतूंपासून सोडवू इच्छित नाही. ही त्याच्या समर्पणाची सुरुवात असते. त्यानं व्यवस्थेला दिलेलं उत्तर असते.

नव्वदोत्तरी ग्रामीण कविता केवळ शेतकऱ्याला आपल्यामध्ये सामावून घेत नाही. तो शेतात राबतो. कबाडकष्ट करतो, निसर्गाची दया याचना भाकतो. आपल्या जित्राबांचा सांगाळ करतो. साधा राहतो. कुठल्याही नव्या गोष्टीचा लोभ करीत नाही. कुटुंबातील सदस्यांचा विचार करतो आणि सरतेशेवटी या जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटतो. इथेच, यामध्येच त्यांची मुक्ती नाही तर या माणसांच्या समाजात तो वावरतो त्यात त्याचा म्हणून एक रूतबा असतो. ज्ञान असते. तिला कुठल्याही प्रकारे झळ बसू नये याची काळजी करीत संयमानं आणि प्रसंगी धाडसानं शेतकरी पाऊलं टाकत राहतो. त्यातच ऐपत नसतानाही स्वसश्रमाच्या आणि निसर्गदयेच्या भरवशावर तो न पेलता येणारं कर्ज घेऊन समाजात आपला शेतकीपणा अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे त्यांच्या एका डोळ्यात स्वप्न असते तर दुसऱ्या डोळ्यात हिमंत. कालपरत्वे हीच त्याची हिंमत कशी खचत गेली व तो गळफासात अडकू लागला याची ताजी ठणक नव्या वातावरणाची कविता करू लागली. कधी काळी उघडयावर पांघरून घालणारा त्याचा सभोवतालचा समाजच त्याला नागडं करण्याच्या भूमिकेत उभा राहिला. घरात ठणठणाट असूनही समृद्ध असण्याचं नाटक त्याला करणं भाग पाडलं, पण त्याची घालमेल, विवंचना, यातना त्यालाच माहीत. ही अनुभूती कविता देऊ लागली. जोडणारे आणि तोडणारे आपलेच असल्याने कोणाला दाद

मागायची हा प्रश्न कवितेतून व्यक्त होऊ लागला, हातचे काहीच शिल्लक न ठेवता अंतर्बाहय.

बदलता भोवताल हे अंतीम सत्य आहे. त्याला नाकारण्याचा प्रयत्न हा हास्यास्पदच म्हणावा लागेल. मागचं, जुनं सर्वकाही सांभाळणं हे जसं शक्य नाही अगदी तसच बदलत्या काळाच्या गतीला थांबवणं, इथे प्रत्येकाला गतीचा विरोध करता येणार नाही. नाहीतर माणूस थांबून जाईल फेकल्यासारखा. हे फेकलेपण आपल्या वाटयाला येऊ नये यासाठीची सुरू झालेली स्पर्धा शेतीच्या परिधामध्ये येणाऱ्या प्रत्येकाच्या अंतर्मनात सुरू आहे. मग तो शेतकरी असो, कामकारी, राजकारणी अथवा शहरात स्थिर होण्याची स्वप्ने पाहणारा त्याच वातावरणातील तरूण. कुणीही असो. या वेगवान वर्तमानात जो टिकतो तो शहरी जीवनीला आपलसे करतो. किंबहुना ग्रामातच आपलं स्थान भक्कम करतो. मिरवतो सर्वसामान्यांच्या जीवावर. आणि करतो उपदेश राजरोसपणे. तुम्हाला काळाची गती कळलीच नाही या अविर्भावामध्ये. जे मागे पडले ते गाडले गेले इथल्या मातीत. पुढे ते विषय होऊ लागले व कथा, कादंबरीचे, भाषणाचे.वादाविदाचे. राजकारण्यांच्या करमणूकीचे. या साऱ्यांना सोबत घेऊन ग्रामीण कविता निर्मितीक्षम झाली. तिचा स्वर वेगळा उमटू लागला. विठ्ठल वाघ आपल्या साहेबराव पाटील या कवितेमध्ये म्हणून जातात, तुहं सरन पेटल्यावर मसनीत एक म्हातारा सांगत होता म्हंतात, आता कापूस जवारी पेरसान त लेकहो हराममौतीनं मरसान उद्वेग विमनस्कता, राग, ओरबाडलेपण वर्तमान ढवळून काढतात. परंपरा संपायच्या आतच नवे शिलेदार जन्मले पाहिजे हे अभिलाषा पांगळं करण्याची अभिव्यक्ती देते, म्हणून आता परंपरेला खिळखिळे करणे क्रमप्राप्त आहे, याचं आलेलं भान अनेक कवी व्यक्त करतात, ही कविता निसर्ग सौंदर्यात रमत नाही. जिथे जीवनातील सत्वच संपायच्या टोकावर येऊन उभं राहावं तिथे केवळ अंगार व्यक्त होते. कारण ही अंगार व्यक्त करणारा दुरस्त उभी राहून पाहणारा नाही तर तोही या आगडोंबाचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. वाटेकरी आहे. भोगता आहे.

अलिकडच्या कालखंडामध्ये राजकीय संस्कृतीच्या संदर्भात जो रोष व्यक्त होतो आहे त्याचे प्रतिबिंब ग्रामीण कवितेतही मोठ्या प्रमाणात पडलेले पाहायला मिळते. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने अनेक योजनांची निर्मिती केल्या गेली. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी पोटतिडाकीणे केल्या गेली का? हा सातत्याने विचारवंतांच्या आणि सर्वसामान्य माणसांच्या चिंतनाचा विषय राहिला आहे. आपणच खऱ्या अर्थाने ग्रामीण समाजाचे पर्यायाने शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते आहोत या तोऱ्यामध्ये धुंद असणाऱ्या राजकीय नेतृत्त्वावरचा विश्वास उडाल्याचं चित्र जसं कवितेत दिसून आलं अगदी त्याच्या उलट याच भूमितून जन्माला आलेलं नेतृत्व सुध्दा शेतकऱ्यांना कसे बेईमान झालं याचं स्वार्थीपण ही कविता सांगू लागली. राजकीय वातावरणाचा धांडोळा घेतला तर काय जाणवते? बहुतांश नेते ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेले आहेत. शेतकऱ्याची चांगली जाण असणारे आहे. तरिही येणारा प्रत्येक हंगाम शेतकऱ्याला नागवं करणाराच ठरतो आहे. त्याच्या गरजा आणि त्यांना पूर्ण करणारं सामर्थ्य तो दिवसेंदिवस हरवत चालला आहे. तेवढ्याच वेगाने त्याची संपन्नतेची सारी स्वप्ने, त्यांच्याच समोर मातीमोल होत आहे. संघटनात्मक कार्याला सामोरा जाऊनही त्याला आपल्या मालाला मूल्यप्राप्त करून-देता आलं नाही. संघटनेतून उभं राहिलेलं नेतृत्व मतलबात गुंतून गारद झालेले त्यानेच पाहिजे. म्हणून शेतकरी संघटन हा विषयही या ग्रामिण कवितेचा होत आहे. ओला– कोरडा दुष्काळ, जागतिकीकरण, शहरीकरण या साऱ्यामध्ये हरवत चाललेला गाव कवितांमधून व्यक्त होतो आहे.

ग्रामीण कादंबरीतून आणखी एक विषय सतत समोर येतांना दिसून येतो आणि तो म्हणजे शिकलेला तरुण. लेकरांना शिकवायला पाहिजे हे भान यापूर्वीच शेतात राबणाऱ्या बापाला जसे येऊ लागले तसेच त्याने आपल्या लेकरांचं भविष्य ऐसपैस पाहायला सुरुवात केली, शिक्षणासाठी लागणारा पैसा तो उभी करीत गेला. तो शेतीच्या भरवशावरच. कर्जाच्या दबावाखाली तर कधी कर्जावर कणखर उभा राहून शेतकरी बाप राबू लागला, संघर्ष करता—करताच याच क्षेत्रात निर्माण झालेला भ्रष्टाचार तो अनुभवू लागला. असे जरी असले तरी मोठ्या धीराने त्याने आपल्या

पेरात्ला त्याच्या लक्षापर्यंत पोहचविलच. अपेक्षा आणि आनंद या दोन संकल्पना त्याच्या आयुष्याला उभारी देत असतानाच शहरात वसलेल्या व संपन्न आयुष्य जगणाऱ्या मुलाकडून आलेला अनुभव त्याच्या मर्यादांची जाणीव करून गेला. शहर की गाव या आत्मिक संघर्षात अडकून पडलेला बाप ग्रामीण कवितेची पानं समृद्ध करू लागला. त्याचा चेहरा लावून माणसं आभाळाला हात लावू लागली. परंतु आभाळाच्या पल्हावण्याचं गणितच विसरून. तो कालही होती. आजही आहे आणि उद्याही आसणार आहे. कारण तोच तर देणार आहे ओळख माणसांना माणूस असायाची.,

पोशिंद्यांची कविता हे डॉ. गजानन नामदेव जाधव यांचे निवडक ग्रामीण कविताचे संपादन कमालीचे अंतर्मुख करणारे आहे. ते विषयांच्या भाषेच्या आणि मांडणीच्या रूपाने. आत्मियता हे त्याचे वेगळेपण आणि सामर्थ्य आहे.

**निष्कर्ष**

१) शेतकऱ्यांची जीवन जाणीव नेमकेपणे टिपली आहे

२) आर्थिक विवंचना शेतकऱ्याच्या गळ्यचा फास ठरते आहे

३ आपल्या लेकरांना शिकविण्याची धडपड हे या कवितांचे वेगळेपण आहे

४ जागतिकीकरणाशी दोन हात करण्याचा प्रयत्न कवी करतो.

५ शेतकरी, सावकार, निसर्ग, शेती, व्यापारी आणि भोवताली असणारा समाज या साऱ्यांचा हिशेब तपासण्याचा प्रयत्न कविता करते.

**संदर्भ :—**

१) पोशिंद्याची कविता — संपा. डॉ. गजानन जाधव,

२) मराठी वाड्मयाचा इतिहास—खंड सातवा १९५० ते २००० संपा.प्रा.रा.ग. जाधव, मसाप, पुणे.

३) ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा — डॉ. वासुदेव मुलाटे.

४) ग्राम संस्कृती — आनंद यादव

**24**

# पंचायतो में महिलाओं की राजनैतिक भूमिका

**अनुताष कुमार**
शोध छात्र, इतिहास विभाग,
कु. मायावती राजकीय महाविद्यालय बादलपुर

**********

भारत में प्राची न काल से ही नारियों को सम्मान दिया जाता रहा है। उनके सन्दर्भ में यह कहा गया है,''यत्र नार्यास्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:'' अर्थात जहाँ नारियों की पूजा होती हैं, वहाँ देवता निवास करते है। भारत में कहीं नारी की पूजा रणचंडी दुर्गा के रूप में होती है तो कहीं माँ सरस्वती के रूप में। नारी सौन्दर्य की प्रतीक होने के नाते प्रशंसा की पात्र रही हैं। धीरे—धीरे नारियों की स्थिति में परिवर्तन होता गया। कई स्तरों पर पुरूषों द्वारा नारियों को दुर्बल समझकर उनके अधिकार व कार्य सीमा में हस्तक्षेप किया जाने लगा। परिवार में कन्या का जन्म अशुभ माना जाने लगा। स्वतन्त्रता प्राप्ति के पश्चात् भारतीय समाज में नारियों की स्थिति में काफी सुधार हुआ। आज भारत में महिलाओं की दशा में काफी सकारात्मक सुधार हुए है और वे विकास के पथ पर अग्रसर हो रही हैं। राजनैतिक क्षेत्र में भी वे पुरूषों से कम नहीं रह गई है। भारतीय समाज में महिलाओं का भविष्य स्वर्णिम है और इनके सहयोग से समाज नवीनता की ओर अग्रसर है।

विश्व के अनेक देशों का अनुभव रहा है कि राष्ट्रीय व ग्रामीण स्तर पर महिलाओं को चुनावों में पर्याप्त प्रतिनिधित्व नही मिल पाया। इस प्रतिनिधित्व को बढ़ाने के बेहतर अवसर स्थानीय स्वशासन में मिल सकते है। इस दश्ष्टि से भारत का उदाहरण महत्वपूर्ण रहा है क्योंकि यहाँ के पंचायती राज में महिलाओं के लिए आरक्षण के कारण विश्व में स्थानीय स्वाशासन